**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता.**
2. **नागपुरात धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाचा उत्साह, दिक्षाभूमीवर विशेष बुद्धवंदनेचे आयोजन.**
3. **पॅरिस ऑलिंम्पिक मधील पदक प्राप्त खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार; नागपूरच्या दिव्या देशमुखला रोख १ कोटी रुपये सुपूर्द.**
4. **गडचिरोली इथं जहाल नक्षल दाम्पत्याचं पोलिसांपुढे आत्मसमर्पण; २००५ पासून ६७४ नक्षल्यांनी केलं आत्मसमर्पण.**

---

**मंत्रिमंडळ निर्णय**

**अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असून याचा लाभ ४२ हजार ८४२ शेतकऱ्यांना होईल. सध्या राज्यात २ हजार ६५९ उपसा सिंचन सहकारी संस्था असून २६१ संस्थांकडे बँकांची थकबाकी आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अवसायानातील आणि नोंदणीरद्द झालेल्या ११७ संस्थांचे मुद्दल कर्ज ८३ कोटी ९ लाख माफ करण्यास मान्यतादेण्यात आली. त्याच प्रमाणे सध्याच्या कार्यरत १४४ संस्थांचे ५० टक्के मुद्दल कर्ज अशी ४९ कोटी ४५ लाख रुपये माफ करण्यास मान्यता देण्यात आली. मुंबईतल्या पाच प्रवेश मार्गांवरील पथ कर हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा निर्णय देखील आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. १ जानेवारी २०१६ पासून या योजनेचा लाभ देण्याचे ठरले असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेचा एकभाग म्हणून ही योजना इतर महाविद्यालयांना लागू आहे. त्यामुळे तिचा लाभ समाजकार्य महाविद्यालयातील अध्यापकांना लागू करण्याची मागणी होती.खंड क्षमापन झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनीपेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याशिवाय, महाराष्ट्रराज्य कौशल्य विद्यापीठाचं**

नामकरण पद्मविभुषण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्यविद्यापीठ होणार आहे. त्याचप्रमाणे उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करायलाही राज्य सरकारनं मान्यता दिली.

---------------------------------------

धम्म चक्र प्रवर्तन दिन

आज 14 ऑक्टोबर. 1956 साली याच दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्या दिवसाची आठवण म्हणून दरवर्षी लाखो अनुयायी दीक्षाभूमी इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी येत असतात. आज सकाळच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूरचे अध्यक्ष भन्ते आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच भगवान गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण करून बुद्धवंदना घेण्यात आली. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी सकाळ पासूनच अनुयायांनी दीक्षाभूमीवर गर्दी केली आहे.

---------------------------------------

खटला जलदगती न्यायालयात

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवू तसच या प्रकरणातल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं. सिद्दीकी यांच्या हत्याप्रकरणातील तिसरा आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली. प्रवीणचा भाऊ शुभम फरार आहे. हे दोघंजण अकोल्यातल्या अकोट इथले रहिवासी आहेत. या दोघांनीच बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कट रचल्याचा पोलिसांना संशय आहे. प्रवीण लोणकर याची मुंबई पोलिस चौकशी करत असून आज त्याला न्यायालयात हजर केलं जाणार आहे.सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगनं घेतल्याची पोस्ट शुब्बू लोणकर या व्यक्तीनं त्याच्या अकाउंटवरून पोस्ट केली. या पोस्टमध्ये सलमान खान आणि दाऊद गँगचाही उल्लेख होता. पोलिसांनी या अकाऊंटचा शोध घेतला असता ते शुभम लोणकर याचेच असून त्यानंच ही पोस्ट लिहिल्याचं स्पष्ट झालं आहे.

---------------------------------------

मुख्यमंत्री-पारशिवनी

आपल्या सरकारने समाजातील प्रत्येक घटकाला न्याय दिला आहे. सर्व योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचा आपण निर्णय घेतला. लोकांच्या कल्याणाचा निधी त्यांच्या हक्काचा आहे. लोक कल्याणाच्या भावनेतून हा निधी त्यांच्या पर्यंत पोहचविणे आणि वंचितांना न्यायाच्या कक्षेत आणणे याला आपण प्राधान्य दिल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. नागपूर

जिल्हयातील पारशिवणी इथं सुमारे २ हजार कोटी रुपये किंमतीच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल सायंकाळी करण्यात आलं.

-------------------------------------

प्रफुल पटेल

आज भंडारा जिल्हयाच्या लाखांदूर इथल्या शेतकरी मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनी संबोधित केलं. यावेळी विरोधकांवर टीका करत महायुतीचं सरकार खऱ्या अर्थाने जनतेचं सरकार असल्याचं ते म्हणाले.

-------------------------------------

भाडेवाढ

दिवाळीत गर्दीच्या हंगामामुळं होणारी भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे. २५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान ही भाडेवाढ होणार होती. यासंदर्भातलं पत्रक शुक्रवारी महामंडळानं प्रसिद्ध केलं होतं. हे पत्रक मागे घेत असल्याचं एसटी महामंडळानं आज जाहीर केलं.

-------------------------------------

ऑलिम्पिक खेळाडूंचा सन्मान

आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पदक प्राप्त खेळाडूंना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते धनादेश आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आलं. मुंबईत सहयाद्री अतिथीगृह इथं आज हा कर्यक्रम पार पडला. ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील ५० मीटर रायफल ३ पोझीशन या उप-प्रकारामध्ये कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे आणि पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील गोळाफेक या उपप्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी या खेळाडूंना त्याचप्रमाणे दिपाली देशपांडे आणि अरविंद चव्हाण या त्यांच्या प्रशिक्षकांनाही सन्मानित करण्यात आलं. स्वप्निल कुसळे यास दोन कोटी रुपये तसेच त्यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांना २० लाख रुपये आणि सचिन खिलारी यास तीन कोटी रुपये तसेच त्यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आलं. त्याचप्रमाणे बुडापेस्ट, इथं दिनांक १० ते २३ सप्टेंबर, या कालावधीत झालेल्या ४५ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत राज्याचे बुद्धीबळपटू विदीत गुजराथी आणि नागपूरच्या दिव्या देशमुख यांचा समावेश होता. या दोन्ही खेळाडूंचा राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी रोख एक कोटी रुपये आणि त्यांचे मार्गदर्शक अनुक्रमे संकल्प गुप्ता आणि अभिजीत कुंटे यांना प्रत्येकी १० लाख रुपये इतकी रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आलं.

---------------------------------------

फेमा

फेडरेशन ऑफ मेडिकल असोसिएशननं कनिष्ठ डॉक्टरांच्या उपोषणाला पाठिंबा देत आज सकाळी ६ वाजल्यापासून ४८ तास काम बंद करण्याचं आवाहन केलं आहे. या बंदमध्ये आपत्कालीन सेवांचा समावेश नसल्याची माहिती असोसिएशनच्या वतीनं डॉ. स्वरोद्योत मुखर्जी यांनी दिली. राज्य सरकारसमोर आपल्या मागण्या मांडण्यासाठी सर्व डॉक्टर आज सकाळी ९ वाजल्यापासून १२ तासांसाठी उपोषणाला बसले आहेत.

---------------------------------------

नक्षल आत्मसमर्पण

गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी राहिलेल्या जहाल नक्षल दाम्पत्याने आज गडचिरोली इथं केंद्रीय राखीव दल आणि जिल्हा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. वरुण राजा मुचाकी उर्फ उंगा उर्फ मनिराम उर्फ रेंगू वय २७ वर्षे आणि त्याची पत्नी रोशनी विजया वाच्छामी वय २४ वर्षे अशी आत्मसमर्पण करणाऱ्या दाम्पत्याची नावे आहेत. वरुण मुचाकी हा छत्तीसगड राज्यातील सुकमा जिल्ह्यातील पिडमिली येथील मूळ रहिवासी असून, तो सध्या भामरागड दलमचा कमांडर म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर चकमक आणि इतर असे एकूण १५ गुन्हे दाखल असून, शासनाने त्याच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. वरुणची पत्नी रोशनी ही भामरागड तालुक्यातील मल्लमपोडूर येथील रहिवासी असून, ती भामरागड दलम सदस्य म्हणून कार्यरत होती. तिच्यावर विविध प्रकारच्या २३ गुन्ह्यांची नोंद असून, शासनाने तिच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. २०२२ पासून आतापर्यंत २७, तर २००५ मध्ये आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून ६७४ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले आहे. नक्षल्यांनी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात यावे, असं आवाहन पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी केलं आहे.

---------------------------------------

उदय सामंत- मेळघाट

शासनाच्या योजना मेळघाट परिसरात प्रभावीपणे राबवून या परिसराच्या विकासासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येणार असल्याचं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. मेळघाट परिसरातील 707 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन काल धारणी इथं करण्यात आलं. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ आदी उपस्थित होते. येत्या काळात सर्व ठिकाणी आरोग्य सुविधा, रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याने या भागाचं चित्र बदलणार असल्याचं जाधव यांनी सांगितलं. दरम्यान, राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत अमरावती जिल्ह्यालाही विविध

उपक्रम राबवून अव्वल स्थान मिळवल्याबद्दल राज्यस्तरीय दोन पुरस्कार मिळाले आहेत. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी ही माहिती दिली.

-----------------------------------------

**अमृत औषधालय**

बुलढाणा इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात अमृत औषधालयाचं लोकार्पण केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झालं. राज्यातलं हे सातवं अमृत औषधालय आहे. गरीब आणि गरजू लोकांना सवलतीच्या दरात उत्तम दर्जाची आणि नामांकित कंपनीची औषधं याठिकाणी उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------